Original

6/


# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

मध्यवर्ती कार्यालय, सिडको भवन, दुसरा मजला, (दक्षिण कक्ष)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.


**क्र.मजीप्रा/२०१५/सभा-१३२/(०६)/आ.४/** **दिनांक. १४.३.२०१६**

**प्रति,**
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्रामविकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
संचालक (तां.) (प्रभारी) तथा प्राधिकरणाचे सदस्य, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

**विषय :** दिनांक १५ फेब्रुवारी, २०१६ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३५व्या बैठकीचे इतिवृत्त.

**महोदय,**

दिनांक १५ फेब्रुवारी, २०१६ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३५व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

**आपला विश्वासू,**

**(उदय जाधव)** 15/3/16
**मुख्य प्रशासकीय अधिकारी**

**सोबत : १३५व्या बैठकीचे इतिवृत्त**
**(पृ.क्र. १ ते २०)**

**प्रत :** खाजगी सचिव (मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय), मंत्रालय, मुंबई यांचे माहितीकरिता. सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे.

**प्रत : माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.
मुख्य अभियंता, म.जी.प्रा., प्रादेशिक विभाग, ठाणे / पुणे / नाशिक/ औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
अधीक्षक अभियंता, (मुख्यालय), मजीप्रा, मुंबई.
अधीक्षक अभियंता, मित्रा, नाशिक.
उप मुख्य लेखाधिकारी ( १ / २) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.
आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.
प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आस्थापना - ) म.जी.प्रा. मुंबई / सिडको भवन, नवी मुंबई.

सोबतच्या इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधित कार्याक्रम बाबीवर त्वरित योग्यती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३५ व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १३५वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.ना.श्री.बबनराव लोणीकर यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक १५ फेब्रुवारी, २०१६ रोजी दुपारी ३.०० वा. मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे दालनात, मंत्रालय, मुंबई ४०००३२ येथे संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.ना. श्री.बबनराव लोणीकर, मंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.श्री.राजेश कुमार, प्रधान सचिव, पा.पु.व स्व.विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
३) मा.श्री.हेमंत लांडगे, संचालक(तां.)(प्रभारी)म.जी.प्रा. तथा म.जी.प्रा. सदस्य, मुंबई.
४) मा.श्री.संतोष कुमार, सदस्य सचिव, म.जी.प्रा.तथा म.जी.प्रा. सदस्य सचिव, मुंबई.
५) मा.श्री.यशवंत.द.बनकर, उप सचिव, मा.प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, यांचे प्रतीनीधी, मंत्रालय, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.
१) श्री.सुधाकर डांगे, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
२) श्री.उदय जाधव, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
३) श्री.एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात करण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.१ :** म.जी.प्राच्या १३४ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

म.जी.प्रा.च्या संचालक मंडळाची १३४ वी सभा दि.६ ऑक्टोबर, २०१५ रोजी संपन्न झाली होती. सदर सभेच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा. संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १३४व्या सभेच्या इतिवृत्तास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.२ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३४ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.६ ऑक्टोबर, २०१५ रोजी संपन्न झालेल्या १३४ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १३४ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ग्राहकांकडील पाणीपट्टी थकबाकीची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांनी वसूल केल्यास त्यांना वसुली रकमेच्या १% प्रोत्साहन भत्ता (Incentive Allowance) देण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत २४ नागरी पाणी पुरवठा केंद्रे व ३० ग्रामीण पाणी पुरवठा योजना चालविल्या जातात. या योजनांतर्गत वैयक्तीक ग्राहकांना करण्यांत आलेल्या पाणी पुरवठया पोटी मजीप्रास रु.५०३.९१ कोटी इतकी थकबाकी येणे आहे. ती वसुली करण्याच्या दृष्टीने मजीप्राच्या कर्मचाऱ्यांना /अधिकाऱ्यांना वसुल करण्यांत आलेल्या रक्कमेच्या १% इतकी रक्कम अथवा जास्तीत जास्त १ लक्ष प्रतीवर्षी इतकी रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणू देण्याचे प्रस्तावित करण्याल आले आहे. सदर प्रस्तावामध्ये शासकीय व निमशासकीय विभाग /संस्था अशा प्रकारच्या ग्राहकांकडील थकबाकी वसूलीचा अपवाद करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावावर साधक बाधक चर्चा करण्यात आली. प्रोत्साहन भत्ता फक्त वैयक्तीक ग्राहकांकडील थकबाकीसाठी न देता संस्थीय ग्राहकांकडील थकबाकी वसुलीसाठी सुध्दा देण्यांत यावा, मात्र शासन स्तरावरुन स्थानिक स्वराज्य संस्थाना देय असलेल्या अनुदानामधून करण्यात येणाऱ्या कपातीव्दारा वसुलीपोटी प्रोत्साहन भत्ता देण्यांत येवू नये अशा सूचना देण्यांत आल्या व खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत आला.

तसेच म.जी.प्रा.ची थकबाकी मोठी असल्याने आऊटसोर्सिंगच्या माध्यमाने (जसे बचत गट इ.) वसूली करण्यास तत्वत: मान्यता दिली व विस्तृत प्रस्ताव पुढच्या बैठकीत आणण्यासाठी आदेश दिले.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव :**

ठराव करण्यांत येतो की, प्राधिकरणाच्या पाणी पुरवठा केंद्रांद्वारे ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या पाण्याची पाणीपट्टी वसूली वाढण्याच्या हेतूने पाणी पुरवठा केंद्रातील थकीत पाणीपट्टी (एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी थकीत असलेली) पोटी वसूल करण्यात आलेल्या थकीत रकमेपैकी "**१%**रक्कम" अशी वसूली करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांना "प्रोत्साहन भत्ता" म्हणून अदा करण्यास प्राधिकरण या ठरावाद्वारे खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

१) पाणी पुरवठा केंद्राची चालू वसुली चालू मागणीच्या ८५% पेक्षा जास्त असावी.

२) प्रोत्साहन भत्त्याची रक्कम एका कर्मचा-याला एका आर्थिक वर्षात रु.१ लक्षपेक्षा जास्त देय असणार नाही.

३) एका आर्थिक वर्षात एकूण प्रोत्साहन भत्ता त्या वर्षातील एकूण थकबाकी वसुलीच्या १% पेक्षा जास्त असणार नाही.

४) ज्या ठिकाणी थकबाकी वसुली सांघिक प्रयत्नाने करण्यात आलेली असेल अशा ठिकाणी प्रोत्साहन भत्त्याची विभागणी संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी गटातील सदस्यांमध्ये शक्यतो सम प्रमाणात करावी. ज्या ठिकाणी कार्यकारी अभियंत्याचा थकबाकी वसुलीमध्ये सहभाग असेल, अशा ठिकाणी प्रोत्साहन अनुदानाची विभागणी संबंधित मंडळाचे अधीक्षक अभियंता करतील.

५) सदर प्रोत्साहन भत्ता शासन स्तरावरुन स्थानिक स्वराज्य संस्थाना देय असलेल्या अनुदानामधून शासनाकडून करण्यात येणाऱ्या कपातीसाठी लागू असणार नाही.

६) ठरावाची अंमलबजावणी १ जानेवारी २०१६ पासून वसूल करण्यात आलेल्या थकबाकी वसुली बाबत करण्यात येईल.

या बाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव हयांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**<u>कार्यक्रम बाब क्र.४</u>** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उपविधी १९८९ मधील कलम ५,६,७, ११ व १२(अ) मधील दरात सुचारणा करणे बाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उपविधी १९८९ मधील कलम ५,६,७,११ व १२ (अ) मधील दरात सुधारणा करणे बाबत संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सर्वंकष चर्चा झाली. तदनंतर सुधारीत दराबाबत पुढीलप्रमाणे ठराव पारीत

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

करण्यात आला व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**ठराव**

**असा** ठराव करण्यात येतो की, उपविधीतील कलक क्र. ५,६,७,११ आणि १२ (अ) अंतर्गत प्राधिकरणाच्या (१) जलमापकाचे सध्याचे मासिक भाडे (२) जोडणीचे शुल्क (३) नळ जोडणी खंडीत करणे/ पुर्न:जोडणी यासाठी सेवा शुल्क (४) जलमापक चाचणीचे सेवा शुल्क (५) जलमापक काढणे व बसविणे (६) पाणी देयकासाठी जलमापकाचे सुरक्षा अनामत रक्कम (७) जलमापकाचे सील जोडणे/ जलमापकाचे सील तोडणे/ जलमापकास हानी पोहचविणे यासाठी दंडात्मक कारवाई इत्यादीसाठी आकारण्यात येणारे भाडे/शुल्क वर प्रस्तावित केल्याप्रमाणे वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याप्रमाणे खाली नमूद केलेल्या विविध बाबींच्या सुधारित दराला मान्यता देऊन तसा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

**१) उपविधी कलम क्र.५ तक्ता क्र.२ प्राधिकरणाच्या जलमापकाचे सुधारित प्रति महा भाडे.**

**(अ) जलमापकाचे भाडे**

| अ.क्र. | जोडणी व्यास मि.मि.मध्ये | जोडणी व्यास इंचामध्ये | जलमापकाचे मासिक भाडे सुधारित (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १५ | १/२ | ३५ |
| २ | २० | ३/४ | ४० |
| ३ | २५ | १ | ११५ |
| ४ | ४० | ११/२ | २१५ |
| ५ | * ५० | २ | ४२५ |
| ६ | * ८० | ३ | ४७० |
| ७ | * १०० | ४ | ५१५ |
| ८ | * १५० | ६ | ६५५ |

*** प्राधिकरणाने मीटर खरेदी केल्यास आकारले जाणारे मासिक दर.**

**टीप:**

१. प्राधिकरणाच्या उप अभियंता कार्यालयात १५ मि.मि.ते ४० मि.मि.व्यासाची जलमापके उपलब्ध नसलतील तर ती ग्राहकांना बाजारातून उपलब्ध करुन द्यावीत.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२. ४० मि.मि.व त्यापेक्षा मोठया व्यासाची जलमापके ग्राहकाने स्वत: खरेदी करणे जरुरीचे आहे.

**२) उपविधी कलम ६ तक्ता क्र.३ नळ जोडणीचे शुल्क., नळ जोडणी खंडीत करणे/पुर्न:जोडणी साठी सेवाशुल्क, कलम ६ तक्ता क्र.३(अ) जलमापक काढणे व बसविणे तसेच कलम क्र ६ तक्ता क्र.३(अ) व ११ जलमापक चाचणी यांचे सेवाशुल्क:**

**(ब) जोडणीचे शुल्क :**

| अ.क्र | जोडणीचा व्यास मि.मि.मध्ये | जोडणीचा व्यास इंचामध्ये | जोडणीचे सेवाशुल्क रुपये (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १५ | १/२ | ४५० |
| २ | २० | ३/४ | ४५० |
| ३ | २५ | १ | ९०० |
| ४ | ४० | **११/२** | ९०० |
| ५ | ५० आणि पुढील | २ आणि पुढील | प्रत्यक्ष अंदाजपत्रकाप्रमाणे |

१. **टीप:** जोडणीसाठी खोदाई आणि भरणी, ग्राहकाने स्वखर्चाने परवानाधारक नळ कारागिराकडून अभियंत्याच्या समक्ष करुन घ्यावयाची आहे.

२. फेरुल बसवायचे असल्यास फेरुलचा खर्च अतिरिक्त असून ग्राहकाने फेरुल स्वत:च्या खर्चाने खरेदी करुन नळ जोडणीच्या वेळी उपलब्ध करुन घ्यावयाचे आहे.

३. सुधारीत दर नागरी व ग्रामीण योजनासाठी समान रहातील.

**४. उपविधी कलम ६ नळ जोडणी खंडीत करणे/पुर्नजोडणी साठी सेवाशुल्क :**

| अ.क्र. | जोडणीचा व्यास मि.मि. | जोडणीचा व्यास इंचामध्ये | सुधारित दर शुल्क (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १५ | १/२ | ५५० |
| २ | २० | ३/४ | ५५० |
| ३ | २५ | १ | १००० |
| ४ | ४० | **११/२** | १००० |
| ५ | ५० आणि पुढील | २ आणि पुढील | प्रत्यक्ष अंदाज पत्रकाप्रमाणे |

**टीप:** १. खोदाई आणि भरणी करणेचा खर्च वरील शुल्कात समाविष्ट आहे.
२. सदर दर हे नागरी व ग्रामीण योजनासाठी समान रहातील.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

## उपविधी कलम ६ तक्ता क्र.३ (अ) जलमापक काढणे व बसविणे.

### (क) जलमापक काढणे व बसविणे.

| अ.क्र. | जलमापकाचा मि.मि. | जलमापकाचा व्यास इंचामध्ये | जलमापक जागेवरुन काढणे व पुन्हा जागेवर बसविणे यासाठीचे सेवाशुल्क (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | १५ | १/२ | २७० |
| २ | २० | ३/४ | ३०० |
| ३ | २५ | १ | ४०० |
| ४ | ४० | ११/२ | ५०० |
| ५ | ५० | २ | ६०० |
| ६ | ८० | ३ | १००० |
| ७ | १०० | ४ ते १२ | १२०० |

### जलमापक चाचणीचे सेवाशुल्क :-

| अ.क्र. | जलमापकाचा व्यास मि.मि. | जलमापकाचा व्यास इंचामध्ये | सुधारित शुल्क रुपये |
|---|---|---|---|
| १ | १५ | १/२ | १०० |
| २ | २० | ३/४ | १५० |
| ३ | २५ | १ | २०० |
| ४ | ४० | ११/२ | २५० |
| ५ | ५० | २ | ३०० |
| ६ | ८० | ३ | ५०० |
| ७ | १०० | ४ | १००० |
| ८ | १५० | ६ | - |

**टीप:-** सदर दर हे नागरी व ग्रामीण योजनांसाठी समान सेवाशुल्कात मिटर काढणे व परत बसविणेचे शुल्क समाविष्ट नाही.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

३५/

### ३. कलम क्र.७ तक्ता क्र.४ पाण्याच्या देयकासाठी आकारण्यात येत असलेले सुरक्षा अनामत रक्कम

**(ड ) पाण्याच्या देयकासाठी आकारण्यात येत असलेले सुरक्षा अनामत रक्कम**

| अ.क्र. | जलमापकाचा व्यास मि.मि. | जलमापकाचा व्यास इंचामध्ये | घरगुती जोडणीसाठी अनामत शुल्क (रुपये)(नागरी) | बिगर घरगुती नळ जोडणीसाठी अनामत रक्कम (रुपये) | ना नफा तत्वावरील संख्यांची नळ जोडणी साठी अनामत रक्कम (रुपये) | ग्रामीण भागासाठी अनामत रक्कम (रुपये ) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ | १/२ | १५०० | ६००० | ३००० | ७५० |
| २ | २० | ३/४ | २५०० | ११००० | ५५०० | १२५० |
| ३ | २५ | १ | ४००० | १५००० | ७००० | २००० |
| ४ | ४० | ११/२ | ९००० | ४०००० | २०००० | ४५०० |
| ५ | ५० | २ | ११००० | ५०००० | २५००० | ५५०० |
| ६ | ८० आणि ८० पेक्षा जास्त | ३ आणि ३ पेक्षा जास्त | सुरक्षा अनामतीची रक्कम ६ महिन्याच्या पाण्याच्या जरुरीनुसार ठरविण्यात येईल. | | | |

**टीप:-** सुधारित सुरक्षा अनाम त रकमेचे सुधारित दर दोन वर्षाच्या पाणी देयकाच्या आधारे अथवा साहित्य आणि मजूरीच्या किंमतीत झालेल्या वाढीवर सुरक्षा अनामत ठरविण्यात येतील.

### ४) कलम क्र.१२(अ) जलमापकाचे सील तोडणे/जलमापकास हानी पोहचविणे यासाठी दंडाची रक्कम.

| अ.क्र. | तपशील | सुधारित दर (रुपये) |
|---|---|---|
| १ | जलमापकास अंशता अथवा पूर्णत: हानी पोहोचलेले आढळल्यास | १००० |
| २ | जलमापकाचे सील तुटलेले आढळल्यास आणि जलमापकास अंशत: अथवा पूर्णत: हानी पोहोचलेली आढळल्यास | म.जी.प्रा.च्या संबंधीत वर्षाच्या दरसूची प्रमाणे किंमत दंडात्मक रक्कम रु.५००/- सह आणि मीटरच्या शेवटच्या वाचनानुसार वापरलेल्या पाण्याची दुप्पट दराने वसुली. |

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.५ :** राज्य सार्वजनिक उपक्रमांच्या अतिरिक्त निधीची गुंतवणुक संदर्भातील सुधारीत मार्गदर्शक तत्वे.

राज्य सार्वजनिक उपक्रमाने अतिरिक्त निधीची गुंतवणुक करण्या बाबत शासनाकडून वेळोवेळी जी मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येतात त्याच्या अधिन राहून म.जी.प्रा. कडुन शिल्लक निधीची गुंतवणुक करण्यात येते, या गुंतवणूकीच्या संदर्भात शासनाकडून शासन निर्णय क्र.शासाऊ-१०.१५/प्र.क्र.४२/सा.ऊ. दि.२७.१०.२०१५ निर्गमित करण्यात आला. सदरहू शासन निर्णयातील गुंतवणूकीसाठी निश्चित केलेले सर्व निकष प्राधिकरणाचे सर्व सदस्यांना अवगत करण्यात आले. सदरहु शासन निर्णय प्राधिकरणाला लागु करणे तसेच प्राधिकरणाच्या ९६व्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार अल्प मुदत/ दिर्घ मुदत यांच्या गुंतवणुकीसाठी निर्णय घेण्यासाठी जी समिती होती त्या मध्ये बदल करुन, खालील प्रमाणे समिती गठीत करण्याचा प्रस्ताव समिती पुढे मान्यते करिता सादर करण्यात आला.

१) एक वर्षा पर्यतच्या अल्प मुदतीची गुंतवणुक करण्यासाठी समिती.
   १) मा.सदस्य सचिव
   २) संचालक(वित्त)

२) एक वर्षापेक्षा अधिक ते तीन वर्षा पर्यंत गुंतवणूक करण्यासाठी समिती.

| | |
|---|---|
| १) मा.मंत्री, पा.पु. व स्व.वि. तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. | समितीचे अध्यक्ष |
| २) प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. | समितीचे सदस्य |
| ३) सदस्य सचिव, म.जी.प्रा. | समितीचे सदस्य |
| ४) संचालक(वित्त) | समितीचे सदस्य |

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, राज्य सार्वजनिक उपक्रमांच्या अतिरिक्त गुंतवणुक करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या खालील समितीस मान्यता देण्यात येत आहे.

१) एक वर्षा पर्यतच्या अल्प मुदतीची गुंतवणुक करण्यासाठी समिती.
   १) मा.सदस्य सचिव
   २) संचालक(वित्त)

२) एक वर्षापेक्षा अधिक ते तीन वर्षा पर्यंत गुंतवणूक करण्यासाठी समिती.

| | |
|---|---|
| १) मा.मंत्री, पा.पु. व स्व.वि. तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. | समितीचे अध्यक्ष |
| २) प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि. | समितीचे सदस्य |
| ३) सदस्य सचिव, म.जी.प्रा. | समितीचे सदस्य |
| ४) संचालक(वित्त) | समितीचे सदस्य |

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.६.** राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरत्या शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणुकीस मान्यता मिळण्या बाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरती शिल्लक रक्कम योग्य रित्या गुंतवावी याबाबत शासनाने वेळावेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत . त्यानुसार मजीप्राकडूनही अल्प व दीर्घ मुदतीच्या गुंतवणुका केल्या जातात, असे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

अल्प मुदतीच्यागुंतवणुकीचा प्रस्ताव सर्वसाधारणपणे १५ दिवस ते १ वर्षापेक्षा कमी कालावधीतील वेगवेगळया टप्यांसाठी प्रस्तावित केले जातात. याकरीता वेगवेगळया राष्ट्रीयकृत बँकाचे /वित्तीय संस्थांचे व्याजदर मागविले जातात. त्यापैकी ज्याबँकांचे व्याजदर सर्वाधिक असतील अशा बॅकेकडे मा. सदस्य सचिव व संचालक (वित्त) यांच्यामान्यतेने गुंतवणुक केली जाते.

तसेच दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीमध्ये (१ वर्षापेक्षा जास्त) घसारा निधी, सिंकींग फंड, पेन्शन फंड व डेसिग्नेटेड अकाऊंट इ. गुंतवणुकीचा समावेश होतो. शासनाच्यावित्त विभागाच्या निर्देशानुसार दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकी फक्त राष्ट्रीयकृत बॅकेत करावयाच्या आहेत, म्हणुन ही गुंतवणुक करतांना राष्ट्रीयकृत बॅकेकडून व्याजदर मागविले जातात. ज्या बॅकांनी सर्वाधिक व्याजदर दिले आहेत अशा बॅकेकडे सदस्य सचिवांच्या मान्यतेने गुंतवणुक केली जाते.

प्राधिकरणाच्या १३४ व्या बैठकीत दिनांक.२७.५.२०१५ ते ६.१०.२०१५ या कालावधीचे अल्प व दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यास मान्यता प्राप्त झाली आहे. आता दि.७.१०.२०१५ ते २९.१.२०१६ या कालावधीत केलेल्याअल्प मुदतीच्या गुंतवणुकीस मा. संचालक मंडळाची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर चर्चा करण्यात येऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली व खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, दिनांक.७.१०.२०१५ ते दि.२९.१.२०१६ या कालावधीत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे करण्यात आलेल्या अल्प व दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीस मान्यता देण्यात येत आहे.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.७** म.जी.प्रा. च्या पाणी पुरवठा केंद्रांतर्गत अनुज्ञप्तीधारक नळ कारागिर (पाणी पुरवठा) (Licensed Plumbers - Water Supply) च्या याद्या अद्ययावत करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सद्य:स्थितीत राज्यातील २४ नागरी व ३० ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची दैनंदिन देखभाल दुरुस्ती व पाणी पुरवठ्याचे काम मजीप्रामार्फत करण्यात येते. या पाणी पुरवठा केंद्राच्या कक्षेतील ग्राहकांना नवीन/वाढीव /तात्पुरती नळ जोडणी हवी असल्यास, अनुज्ञप्तीधारक प्लंबर यांचे मार्फत स्थानिक कार्यालयाकडे अर्ज सादर करावा लागतो. ग्राहकाने मागणी केलेल्या भागातील मजीप्राच्या वितरण व्यवस्थेस अनुसरुन प्रस्तावित नळ जोडणीची सद्य:स्थिती, अस्तित्वातील वितरण व्यवस्थेचा व्यास इ. बाबी दर्शविणारा नकाशा क्षेत्रीय पाहणी करुन तयार करणे, मजीप्राने विहित केलेल्या नमुन्यात व योग्य कागदपत्रांसह अर्ज सादर करण्यास मदत करणे, नळ जोडणी आकार, सुरक्षा अनामत इ.बाबत ग्राहकांस माहिती देणे, नळ जोडणीस मंजुरी मिळाल्यानंतर मजीप्राने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार प्रत्यक्षात नळ जोडणी देणे इ. कामे नळ कारागीरास करावी लागतात.

विविध कार्यालयांकडून प्राप्त माहितीनुसार, गेल्या अनेक वर्षांपासून मजीप्रामधील नळ कारागीरांच्या याद्या अद्ययावत करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे सद्य:स्थितीत अनुज्ञप्तीधारक नळ कारागीरांची संख्या अपुरी आहे. वास्तविकत: नळ कारागीरांच्या कामगिरीचे वार्षिक मूल्यमापन करुन अकार्यक्षम नळ कारांगिरांची नावे यादीतून कमी करणे तसेच नवीन अनुज्ञप्तीद्वारे जादा नळ कारागिरांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

नळ कारागिरांच्या नेमणुकीबाबत भारतीय मानक संस्थेने मानक क्र.१२२०८ १९८५ जारी केले असून त्यास अनुसरून मजीप्रा कडील नळ कारागिरांच्या याद्या अद्ययावत करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. तसेच म.जी.प्रा. कडे फक्त पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल-दुरुस्तीचे काम असल्याने यापुढे फक्त पाणी पुरवठ्यासंबंधी कामे करण्यासाठी नळ कारागीरांच्या याद्या तयार करण्याचे व म.जी.प्रा. कडील अनुज्ञप्तीधारक नळ कारागीरांना अनुज्ञप्तीधारक प्लंबर (पा.पु) (Licensed Plumber-Water Supply) असे संबोधण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून फक्त पाणी पुरवठ्या करिता नळ कारागिरांची यादी तयार न करता, स्वच्छता विषयक नळ कारागीरांचीही यादी करावी अशा सूचना देण्यांत आल्या.

**ठराव :**

म.जी.प्रा. कडील नळ कारागीरांच्या याद्या अद्ययावत करण्यास तसेच मजीप्राकडील अनुज्ञप्तीधारक नळ कारागीर नोंदणीकरिता खालीलप्रमाणे प्रक्रिया निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मजीप्राकडे अनुज्ञप्तीधारक नळ कारागीर म्हणून नोंद होण्याकरिता खालीलप्रमाणे अर्हता आवश्यक राहील. तसेच म.जी.प्रा. ने निश्चित कलेल्या प्रक्रियेनुसार परिक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे राहिल.

१. **अर्हता** - कमीत कमी आय.टी.आय.संस्थेतील संबंधित शाखेतील (फिटर/प्लंबर) अर्हता असावी. स्थापत्य अभियांत्रिकी पदवी/ पदविकाधारक सुध्दा अनुज्ञप्तीधारक नळ कारागीर म्हणून काम करण्यास पात्र राहतील.
   i. स्थानिक भाषेचे ज्ञान असावे.
   ii. नकाशावाचनाचे ज्ञान असावे.

२. लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेत प्रत्येकी किमान ५० टक्के गुण मिळणे अनिवार्य राहिल. परिक्षेसाठी अभ्यासक्रम निश्चित करण्याचे अधिकार सदस्य सचिव यांना राहतील.

३. अर्जासाठी तपासणी शुल्क म्हणून सद्य:स्थितीत रु.५००/- (रु.पाचशे फक्त) इतके शुल्क देय राहील. वार्षिक शुल्कामध्ये वेळोवेळी वाढ करण्याचे अधिकार सदस्य सचिव, मजीप्रा यांना राहतील. या संदर्भात मध्यवर्ती कार्यालयातील लेखा शाखेमार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

४. अनुज्ञप्तीचे दरवर्षी नूतनीकरण करणे आवश्यक राहील. नवीन अनुज्ञप्ती व अनुज्ञप्ती नूतनीकरणाकरिता सद्य:स्थितीत वार्षिक रु.२०००/- इतके शुल्क देय राहील. वार्षिक शुल्कामध्ये वेळोवेळी वाढ करण्याचे अधिकार सदस्य सचिव, मजीप्रा यांना रहातील. या संदर्भात मध्यवर्ती कार्यालयातील लेखा शाखेमार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

५. पात्र उमेदवारांचे कामासंबंधीचे ज्ञान तपासण्याच्या दृष्टीने प्रात्यक्षिक व लेखी परिक्षा तीन वर्षात एकदा आयोजित करण्याची जबाबदारी व अधिकार संचालक, मीत्रा यांना राहतील.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

६. संचालक, मीत्रा यांनी पात्र ठरविलेल्या नळ कारागीरांना अनुज्ञप्ती जारी करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना राहतील. अनुज्ञप्ती धारक नळ कारागिरांची (पाणी पुरवठा व स्वच्छता) यादी संबंधित कार्यकारी अभियंता हे ठेवतील.

प्रत्यक्ष नोंदणीकरिता प्रक्रिया निश्चित करण्यासाठी व त्या करिता आवश्यक कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.८** चिखलदरा पाणी पुरवठा योजने (देखभाल व दुरुस्ती) अंतर्गत आमझरी हेडवर्क्स येथील जुने ६० अश्वशक्ती सेंट्रीफयुगल पंप संच घसारा निधी अंतर्गत बदलविणे.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. म.जी.प्रा. मार्फत चालविण्यांत येत असलेल्या चिखलदरा पाणी पुरवठा योजनेमधील ६० अश्वशक्ती पंपांचे आयुष्यमान संपल्याने ते बदलणे गरजेचे आहे. या कामाकरिता रु.७.३३ लक्ष निव्वळ आणि रु.८.६१ लक्ष ढोबळ इतका खर्च अपेक्षित आहे. पंप बदलल्यास देखभाल व दुरुस्ती वरील खर्च कमी होईल, पाणी पुरवठा वारंवार खंडीत न होवून सेवेचा दर्जा सुधारला जाईल, तसेच वीज बिलापोटीचा खर्च कमी होईल. त्यामुळे या बाबीस मान्यता देण्याची विनंती करण्यात आली.

कामाचे स्वरुप लक्षात घेता अशा प्रकारची कामे टंचाई कामाअंतर्गत प्रस्तावित करण्यात यावीत असे निर्देश संचालक मंडळाने दिले. तथापि, टंचाई अंतर्गत निधी प्राप्त होईपर्यंत मजीप्राने स्वत:च्या निधीमधून आवश्यक खर्च करण्यास हरकत नाही अशा सूचना देण्यांत आल्या.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, चिखलदरा पाणी पुरवठा योजनेवरील देखभाल व दुरुस्तीचा आर्थिक भार कमी करणे, वीज देयकाचा आर्थिक भार कमी करणे आणि नागरीकांना शाश्वत पाणी पुरवठा उपलब्ध करुन देणे या करिता योजनेमधील ६० अश्वशक्ती पंप बदलण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, यासाठी शासनाच्या टंचाई कार्यक्रमामधून निधी प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करावा.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२१

अशा प्रकारे निधी प्राप्त होईपर्यंत मजीप्राकडील घसारा निधीमधून निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.९ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा अंतर्गत कंत्राटदारांच्या नोंदणी नियमांमध्ये सुधारणा करणे बाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. प्राधिकरणाकडे कंत्राटदाराच्या नोंदणीकरीता वेळोवेळी आदेश निर्गमीत करण्यांत आलेले आहेत. प्रचलित नियमानुसार कंत्राटदाराने नोंदणी करिता अर्ज सादर करताना पाणी पुरवठा किंवा मलनि:सारण योजनेशी निगडीत कामे पार पाडलेली असलेबाबत माहिती सादर करणे आवश्यक आहे. प्रचलित नियमावलीमध्ये कोणकोणत्या प्रकारची कामे पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनेशी निगडीत आहेत याबाबतचा उल्लेख केलेला नाही. नोंदणीकरीता कंत्राटदारांमार्फत विचारात घ्यावयाची कामे ही कंत्राटदारामार्फत या दोन योजनांशी संबंधित प्रत्यक्षातील बांधकामांच्या अनुभवासंदर्भात असणे अपेक्षित आहेत. तथापि, ज्या कंत्राटदारामार्फत पाणी पुरवठा योजनांची दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे पार पाडलेली आहेत, ती गृहित धरण्याबाबत मागणी त्यांच्या मार्फत नोंदणी देण्याच्या वेळेस करण्यात येत आहे. तसेच काही प्रकरणांमध्ये केवळ सुधारणा कामाच्या अनुभवाचा अनुषंगाने नोंदणीची मागणी केली जाते. त्यामुळे या संदर्भात अधिकचे स्पष्टीकरण करणे अत्यावश्यक झाले आहे.

तसेच यापूर्वी कंत्राटदारांमार्फत सादर केलेल्या मुळ नोंदणी अर्जाची वैधता ही त्यांनी नोंदणी फी भरलेल्या दिनांकापासून एक वर्ष इतकी होती. तथापि, काही कंत्राटदारांमार्फत अपूर्ण माहितीसह/कागदपत्रासह प्रस्ताव प्राधिकरणाकडे प्राप्त होतात. अशा प्रस्तावांची पडताळणी करुन प्राधिकरणाकडून त्या प्रस्तावातील त्रुटिंची पूर्तता कंत्राटदारास कळवून देखिल सुमारे एक वर्षापेक्षा जास्तीचा कालावधी उलटून देखिल काही कंत्राटदारांमार्फत त्यांची पूर्तता करण्यात येत नाही, किंवा पूर्तता करण्यास सुमारे चार ते पाच महिन्यांचा कालावधी घेण्यात येतो. त्यामुळे संबंधित कंत्राटदारांचे नोदणीचे प्रस्ताव प्राधिकरणाकडे दिर्घकाळ प्रलंबित राहतात. प्राधिकरणाकडे प्राप्त होणारे कंत्राटदार नोंदणीचे प्रस्ताव सादर करताना कंत्राटदाराने परिपूर्ण सादर करणे तसेच सदर प्रस्तावावर वेळेत व त्वरीत कार्यवाही होणेच्या

| | |
|---|---|
| मा.मंत्री,<br>पा.पु. व स्व. तथा<br>अध्यक्ष, म.जी.प्रा. | सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा. |

दृष्टीने नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे काही सुधारणा करणेची आवश्यकता असल्याचे संचालक मंडळाच्या निदर्शनास आणण्यात आले.

**१. कंत्राटदार नोंदणीसाठी विचारात घ्यावयाच्या कामांच्या अनुभवाबाबत पुढील प्रमाणे स्पष्टता आणण्याचे प्रस्तावित आहे.**

कंत्राटदार नोंदणी देताना पाणी पुरवठा किंवा मलनि:सारण योजनेशी निगडित काम पार पाडलेली असली पाहिजे असे परिपत्रक क्र.१७०, दि.२१.११.२०१५ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये अधिक स्पष्टता आणण्यात येत आहे. कंत्राटदाराच्या कामांच्या अनुभवाचा विचार करताना कामाची व्याप्ती केवळ देखभाल-दुरुस्ती, सुधारणा कामांचा एवढाच असेल तर अशा देखभाल-दुरुस्ती कामांचा, सुधारणा कामांचा विचार पाणी पुरवठा व मलनि:सारण अनुभवासाठी गृहीत धरु नये. देखभाल-दुरुस्तीच्या कामामध्ये, सुधारणा कामांमध्ये जर भांडवली स्वरुपाच्या कामांचा समावेश असेल तर अशा केवळ भांडवली कामांपुरता अनुभव विचारात घेण्यात येईल.

**२. कंत्राटदार नोंदणी पध्दत सुटसुटीत व वेगवान करण्याच्या दृष्टीने नोंदणी नियामवली** मुद्दा १.०१, व १.०१(xix) **मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहे.**

नोंदणी नियमावली मधील मुद्या १.०१ नुसार कंत्राटदाराने परिशिष्ट-अ मधील विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तथापि प्रस्तावातील पडताळणी सुलभ होण्याच्या दृष्टीने सदर विहित नमुन्यातील अर्जासोबत परिशिष्ट-अ-१ जोडणे आवश्यक आहे. (सोबत प्रत जोडली आहे).

तसेच नोंदणी नियमावली मधील मुद्या १.०१ (**xix**) नुसार मुळ नोंदणी अर्जाची वैधता एक वर्षाची आहे. त्यामुळे त्रुटींच्या पुर्तते अभावी नोंदणीचे प्रस्ताव प्राधिकरणाकडे दिर्घ काळ प्रलंबित राहतात त्यामुळे सदर अर्जाची वैधता कालावधी जरी एक वर्ष असला तरी ठेकेदारामार्फत पूर्तता होणे अपेक्षित असलेले मुद्दे ठेकेदाराला कळविल्यानंतर एक महिन्याच्या आत त्याने त्या मुद्यांची पूर्तता करणे आवश्यक राहील. अन्यथा नोंदणी अर्ज दफ्तरदाखल करण्यात येईल.

त्यानुसार नोंदणी नियमावलीमध्ये बदल करण्यास प्रस्तावित करण्यात आले. याबाबत या कार्यालयाचे परिपत्रक क्र. १७२, दिनांक ०६.०१.२०१६ अन्वये सविस्तर सूचना सर्व क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आलेल्या असून या कार्यालयामार्फत

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

करण्यात आलेल्या या कार्यवाहीस संचालक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्याची विनंती करण्यात आली. उपरोक्त सुधारणा व्यतिरिक्त ठेकेदार नोंदणीबाबत इतर नियम पूर्वीप्रमाणेच राहतील.

याबाबत चर्चा हावून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत नोंदणी नियमावलीमध्ये प्रस्तावित केलेल्या सुधारणेस तसेच केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे. याअनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास प्राधिकरणाच्या सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१० :** महाराष्ट्र सुवर्ण जयंती अभियान कार्यक्रमांतर्गत वाढीव अंबरनाथ व कुळगांव - बदलापूर पाणी पुरवठा योजना. म.जी.प्रा. च्या हिश्याची कर्जापोटीची रक्कम मजीप्राच्या घसारा निधीतून उपलब्ध करण्याबाबत.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती अभियान कार्यक्रमांतर्गत वाढीव अंबरनाथ व कुळगांव बदलापूर पाणी पुरवठा योजनांना अनुक्रमे दिनांक ३१.३.२०१२ व २६ मार्च २०१३ च्या नगर विकास विभागाच्या शासन निर्णयाव्दारे प्रशासकीय मन्यता प्राप्त असुन सदर योजनांची कामे प्रगती पथावर आहेत.

सदर योजनेसाठी मंजूर होऊन प्रगतीपथावर असलेल्या वाढीव पाणी पुरवठा यांजनांच्या वित्तीय आकृतीबंधा नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या हिश्याची रक्कम रु.३१.५० कोटी कर्ज म्हणून हुडको या वित्तीय संस्थेकडून घेण्याच्या मंडळाच्या १२७ व्या बैठकीत घेतलेला निर्णय रद्द करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. त्या ऐवजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या हिश्याची दोन्ही योजनांसाठीची रु.३१.५० कोटी रक्कम कामाच्या प्रगतीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या घसारा निधीतून उपलब्ध करण्याचा प्रस्ताव मंडळापुढे ठेवण्यात आला. ह्या निधीची गुंतवणुक अंतगर्कत गुंतवणूक अंतर्गतरित्या केल्याने मंडळाच्या व्याजापोटी ३ ते ३.५०% रक्कम अतिरिक्त मिळेल. सदरचे कर्ज घसारा निधीतून उपलब्ध करण्यास बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या घसारा निधीतून उपलब्ध करुन घ्यावयाच्या रु.३१.५० कोटी रक्कमेची परतफेड दोन्ही योजनांच्या उत्पन्नातून दरवर्षी रु.४५०.१८ लक्ष या हप्त्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या घसारा निधीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. उपरोक्त मान्य ठरावानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करण्यास मा. सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

| | |
|---|---|
| **आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१ :** | प्रादेशिक तानंग व इतर ७ गांवे पाणी पुरवठा योजना, ता.मिरज, जि. सांगली.<br>देखभाल व दुरुस्तीच्या उपाययोजनांसाठी मजीप्राच्या स्वनिधीतून अनूदान उपलब्ध करुन देणेबाबत. |

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. म.जी.प्रा. मार्फत तानंग प्रादेशिक योजनेच्या देखभाल दुरुस्तीचे काम पाहिले जाते. सदर योजनेमध्ये हिशोब बाह्य पाण्याचे प्रमाण खूप मोठे असून ते कमी करण्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव :**

१) पाण्याचे नेमके मोजमाप होण्यासाठी गावांसाठीच्या पाण्याच्या जलकुंभांच्या मागे बल्क मीटर्स बसविणे आवश्यक आहे. यासाठी रु.१४.६४ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

२) सर्व गांवासाठी गुरुत्वनलिकांवर असणारे स्लुईस व्हॉल्व्ह बदलणे गरजेचे आहे. तसेच सुभाषनगरमध्ये मुख्य वितरण पाईपलाईन जवळून १६० मि.मी. ३७५ मी. लांबीचे समांतर पीव्हीसी पाईपलाईन टाकणे आवश्यक आहे. यासाठीचा खर्च रु.४.३१ लक्ष इतका अपेक्षित आहे.

वरील उपाययोजनांसाठी रु.१८.९५ किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या उपाययोजनांमुळे हिशोबबाह्य पाण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सदर प्रस्तावावर संचालक मंडळाची साधकबाधक चर्चा झाली. म.जी.प्रा. मार्फत चालविण्यांत येत असलेल्या व तोट्यात चालत असलेल्या सर्व योजना संबंधीत स्थानीक स्वराज्य संस्थांना हस्तांतरीत करण्याबाबत यापुर्वीक संचालक मंडळाने ठराव पारीत केला आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या सर्व योजना हस्तांतरीत करण्याच्या दृष्टीने संबंधीत जिल्हा परिषदांना लेखी सूचना देणे व त्यानंतर योजनेच्या देखभाल दुरुस्तीचे काम थांबविणे या बाबत आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी असे आदेश देण्यांत आले.

कामाचे स्वरुप लक्षात घेता अशा प्रकारची कामे टंचाई कामाअंतर्गत प्रस्तावित करण्यात यावीत असे निर्देश संचालक मंडळाने दिले.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, प्रादेशिक तानंग व इतर ७ गांवे पाणी पुरवठा योजना सुधारणा कामाच्या प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे. तथापि, यासाठी शासनाच्या टंचाई कार्यक्रमामधूनही निधी प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करावा. तसेच योजना जिल्हा परिषदेस हस्तांतरीत करण्यात यावी.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. २ :** शिरभावी व ८१ गावे प्रादे. पाणी पुरवठा योजना, ता.सांगोला जि.सोलापूर
देखभाल दुरुस्तीच्या उपाययोजनांसाठी मजीप्राच्या स्वनिधीतून अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत.

सोलापूर जिल्हयातील सांगोला तालुका हा अवर्षणग्रस्त असून या तालुक्यातील ८२ गांवांसाठी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना भीमा नदी उद्भव घेवून राबविणेत आलेली आहे. सदर योजनेस माहे डिसेंबर १९९८ मध्ये प्रशासकीय मान्यता प्राप्त योजना टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्यात आली. ही योजना एप्रिल २००५ पासून पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात आली आहे. मजीप्राच्या संचालक मंडळाच्या १०२ व्या बैठकीत ठरल्यानुसार, सन २००७ पासून सदर योजना मजीप्रामार्फत चालविण्यात येत आहे. या योजनेतून समाविष्ठ गावांसह दोन सूत

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

गिरण्या, एमआयडीसी तसेच सिंहगड शैक्षणिक संकुल यानांही आवश्यकतेनुसार पाणी पुरवठा करण्यात येतो.

सदर योजना १५५० चौ. कि.मी. क्षेत्रफळात विखुरलेली आहे. गुरुत्ववाहिनी व उध्दरण नलिका पाईपलाईनची एकूण लांबी ५६२ कि.मी. आहे. या योजनेतून हिशोबबाह्य पाण्याचे प्रमाण ५३.५१% इतके आहे. दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करताना येत असलेल्या अडचणीं व हिशोबबाह्य पाण्याचे प्रमाण कमी करणे या बाबी विचारात घेऊन, पुढीलप्रमाणे उपाययोजना प्रस्तावित करण्यात येत आहे.

**प्रस्ताव :**

| अ.क्र. | उपांगाचा तपशील | किंमत रु. |
|---|---|---|
| १) | उंच जलकुंभांच्या इनलेट येथे एएमआर अल्ट्रासॉनिक बल्क मीटर बसविणे. | रु.६०,५०,६५९/- |
| २) | संतुलित जलकुंभाच्या आऊटलेट येथे एएमआर अल्ट्रासॉनिक बल्क मीटर बसविणे. | रु.२१,३२,२६५/- |
| ३) | उर्ध्ववाहिनीसाठीच्या आऊटलेट येथे एएमआर अल्ट्रासॉनिक बल्क मीटर बसविणे. | रु.२२,६६,९५०/- |
| ४) | पंपीग मशिनरी दुरुस्ती | रु. ५०,०५,८८२/- |
| ५) | उर्ध्ववाहिनीवर एक्स्पॅन्शन जॉईटस व एअर व्हॉल्व बसविणे. | रु.६४,३५,४००/- |
| | **एकूण निव्वळ किंमत** | **रु.२,१८,९१,१५६/-** |

सदर प्रस्तावावर संचालक मंडळाची साधकबाधक चर्चा झाली. म.जी.प्रा. मार्फत चालविण्यांत येत असलेल्या व तोट्यात चालत असलेल्या सर्व योजना संबंधीत स्थानीक स्वराज्य संस्थांना हस्तांतरीत करण्याबाबत यापुर्वीच संचालक मंडळाने ठराव पारीत केला आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या सर्व योजना हस्तांतरीत करण्याच्या दृष्टीने संबंधीत जिल्हा परिषदांना लेखी सूचना देणे व त्यानंतर योजनेचे परिचालन व देखभाल दुरुस्तीचे काम थांबविणे या बाबत आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी असे आदेश देण्यांत आले.

कामाचे स्वरुप लक्षात घेता अशा प्रकारची कामे टंचाई कामाअंतर्गत प्रस्तावित करण्यात यावीत असे निर्देश संचालक मंडळाने दिले.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२७/

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, शिरभावी व ८१ गावे प्रादे. पाणी पुरवठा योजना, ता.सांगोला जि.सोलापूर योजना हस्तांतरण करुन घेण्यासाठी जिल्हा परिषदेस नोटीस द्यावी व योजना जिल्हा परिषदेस हस्तांतरीत करण्यात यावी.
शासनाच्या टंचाई कार्यक्रमामधून निधी प्राप्त करुन घेण्यात यावा.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. ३ :** राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे मजीप्रातील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर म.जी.प्रा. तील अधिकारी / कर्मचाऱ्यांना सदर योजना लागू करणेबाबत.

पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसलेल्या शासनाकडील कर्मचाऱ्यांकरिता सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली आहे. त्यानुसार सूरवातीला १२ वर्षाच्या सेवेनंतर व त्यानंतर पुन्हा १२ वर्षाच्या सेवेनंतर वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी देण्यांत येते. म.जी.प्रा. मधील कर्मचाऱ्यांना शासन निर्णय दि.१ एप्रिल, २०१०, वित्त विभाग क्र.वेतन-१०१०९/प्र.क्र.४४/सेवा-३ अन्वये सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली असून सुधारित सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना (२४ वर्षाच्या सेवेनंतर) शासनाच्या धर्तीवर लागू करण्याचे विचाराधिन आहे. तथापी मजीप्राची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असल्याने सदरहू सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संचालक मंडळाच्या निर्णयाच्या दिनांकापासून लागू करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

सदर प्रस्तावावर साधक बाधक चर्चा झाली. म.जी.प्रा. मधील अधिकारी / कर्मचाऱ्यांकरिता शासनाचे सर्व सेवा नियम लागू करण्यात आले असल्यामुळे तसेच ६व्या वेतन आयोगाच्या शिफारशी म.जी.प्रा.स यापूर्वीच लागू करण्यात आल्या असल्याने सदर प्रस्ताव मान्य करणे योग्य असल्याचे संचालक मंडळाच्या निदर्शनास आणन्यात आले. सदर प्रस्ताव मान्य करण्यात येवून खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव :**

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेतन-११०९/प्र.क्र. ४४/सेवा३ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक १ एप्रिल, २०१० अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दि.१/१०/२००६ पासून सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केलेली आहे. तथापी मजीप्राची आर्थिक स्थिती बिकट असल्याने ही योजना मजीप्रा कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आली नव्हती.

याबाबत कर्मचाऱ्यांची सततची मागणी विचारात घेवून असा ठराव करण्यात येतो की, राज्य शासनाने लागू केलेली सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संचालक मंडळाच्या निर्णयाच्या दिनांकापासून म्हणजे दि.१५.२.२०१६ पासून प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी यांना लागू करण्यात यावी. याबाबतची पुढील कार्यवाही शासन मान्यतेने करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. ४ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासनिक अहवालास मान्यता देणे.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा वार्षिक अहवाल संचालक मंडळासमोर अवलोकनार्थ व मान्यतेसाठी ठेवण्यांत आला होता. सदर अहवालावर साधक बाधक चर्चा हावून सदर अहवालावर खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

प्राधिकरणाचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा वार्षिक अहवाल स्वीकृत करण्यात येत असून तो विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्याची पुढील कोर्यवाही करण्याचे अधिकार सदस्य सचिव यांना देण्यात येत आहेत.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.